Published Date:	9 Sep 2026	Publication:	Navrashtra (Marathi) [Pune]
Journalist:	Bureau	Page No:	4
Circulation:	202,000		

टाटा ॲग्रेसिव्ह हायब्रिड फंडाला मिळतेय पसंती

हायब्रिड फंडांतून वाढ, सुरक्षितता

पुणे, शहर प्रतिनिधी सध्याचे बदलते आर्थिक संकेत आणि शेअर बाजारातील चढ-उतारांमुळे गुंतवणुकीचे वातावरण अस्थिर बनले आहे. अशा काळात, बाजारातील घसरणीपासून सुरक्षितता मिळवण्यासोबतच गुंतवणुकीत दीर्घकालीन वाढ हवी असणाऱ्या छोट्या गुंतवणूकदारांसाठी 'ॲग्रेसिव्ह हायब्रिड फंड्'ने आपले स्थान अधिक मजबूत केले आहे. असोसिएशन ऑफ म्युच्युअल फंड्स इन इंडिया या संस्थेच्या आकडेवारीनुसार, सध्याच्या अनिश्चिततेच्या काळात छोट्या गुंतवणूकदारांनी केवळ शेअर बाजारात पैसे लावण्याऐवजी हायब्रिड कॅटेगरीला अधिक पसंती दिली आहे. गुंतवणूकदारांचा हा कल सातत्याने वाढत आहे. गुंतवणूकदारांच्या याच वाढत्या कलानुरूप 'टाटा ॲग्रेसिव्ह हायब्रिड फंड'ला गुंतवणूकदारांकडून मोठी पसंती मिळत असल्याचे दिसून आले आहे. ३० ऑगस्ट २०२६ पर्यंत या फंडाच्या व्यवस्थापनाखालील एकूण मालमत्ता सुमारे ४,०७० कोटी रुपयांवर पोहोचली आहे. टाटा ॲसेट मॅनेजमेंटचे फंड मॅनेजर सतीश चंद्र मिश्रा म्हणाले, आजच्या अस्थिर बाजारपेठेत गुंतवणुकीची वाढ आणि भांडवलाचे रक्षण या दोन्ही गोष्टींचा योग्य समतोल साधणे अत्यंत आवश्यक आहे. ॲग्रेसिव्ह हायब्रिड स्ट्रॅटेजीज' गुंतवणूकदारांना हाच उत्तम ताळमेळ मिळवून देतात. या फंडसच्या माध्यमातून गुंतवणूकदारांना एका बाजूला भारताच्या आर्थिक प्रगतीमध्ये (इक्विटीद्वारे) सहभागी होण्याची संधी मिळते, तर दुसऱ्या बाजूला यातील डेट घटक बाजारातील चढ-उतारांचे धक्के पचवण्याचे काम करतो.